लोकमत

मस्ट READ

# ॲसिड विक्रीसंबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज

## पीडितांची मानवी हक्क आयोगाला भेट व चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ॲसिड हल्ले रोखण्यासाठी आणि ॲसिड विक्रीसंबंधीचे कायदे प्रभावीपणे अंमलात आणण्याची गरज आहे, त्यासाठी मानवी हक्क आयोगासोबत संयुक्त उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज पीडितांनी व्यक्त केली.

ॲसिड हल्ला पीडित महिलांनी आपल्या जखमा आणि वेदनांना मागे टाकत समाजापुढे ठामपणे उभे राहत, कायदा बदलासाठी आवाज उठवला आहे. शिरोज यात्रेचा भाग असलेल्या देशभरातील ॲसिड हल्ला पीडितांनी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाची भेट घेतली.

छांव फाउंडेशनतर्फे राबविल्या जाणाऱ्या या यात्रेचा हा मुंबईतील शेवटचा टप्पा असून दिल्ली, आग्रा, इंदूर, शिर्डी आणि पुणे येथून ते मुंबईत आले.

**महिलांच्या सुरक्षिततेसाठी कडक कायदे करून त्यांच्या अंमलबजावणीवर चर्चा झाली.**

मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर, सचिव प्रदीपकुमार डांगे आणि निबंधक विजय केदार, सहायक निबंधक नूतन भोसले यांनी त्यांचे स्वागत करून त्यांच्याशी चर्चा केली.

पीडितांनी त्यांच्या दुःखद अनुभवांपासून पुनरुत्थानाच्या प्रवासापर्यंतच्या कथा मांडत, महाराष्ट्रात ॲसिडविषयक नियंत्रण, आधार व जनजागृतीची गरज असल्याचे अधोरेखित केले.



### किरणा दुकानांमध्ये खुलेआम विक्री

राज्यात किराणा दुकानांतून टॉयलेट क्लिनरच्या नावाखाली धोकादायक ॲसिडची विक्री होत असल्याचे निदर्शनास आणले. न्यायमूर्ती बदर यांनी, ठोस पुरावे दिल्यास आयोग तत्काळ जिल्हा व राज्य प्रशासनाला कारवाईसाठी आदेश देईल, अशी ग्वाही दिली.

### घटनेची नोंद होण्याचे प्रमाण कमी

ॲसिड हल्ले नोंद होण्याचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी पीडित अदृश्य व आधाराविना राहतात, असे 'छांव'चे आलोक दीक्षित यांनी सांगितले.

**भरपाई, वैद्यकीय मदत, कायदेशीर साहाय्य व पुनर्वसनाबाबत राज्यव्यापी आढावा घेण्याची मागणी केली. यावेळी ॲड. आकाश गोस्वामी व गौतम कुमार उपस्थित होते.**

Hello Mumbai
Page No. 3 Aug 27, 2025
Powered by: erelego.com

# पीडितांची मानवी हक्क आयोगाला भेट व चर्चा













